
ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : III ISSUE III Oct.- Dec.2019



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail com
www.powerofknowledge.co.in

Scanned with CamScanner

# पर्यटन व पर्यटनाचे प्रकार

डॉ.आर.सी.फाटक
इतिहास विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा, जि.बीड (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

लॅटीन भाषेतील Tornos या शब्दापासून प्रवास हा शब्द आलेला आहे. प्रवास या शब्दाच्याच संबंधीत Tour पर्यटन ही संज्ञा आहे. कामासाठी मनोरंजन म्हणून किंवा फुरसतीच्या वेळी केलेला प्रवास म्हणजेच पर्यटन होय. अशी पर्यटनाची सर्वसाधारण व्याख्या केली जाते.

आपल्या परिघा बाहेरील जागी जाऊन सलग एक वर्षापेक्षा कमी काळ मनोरंजन काम किंवा इतर कारणासाठी राहणाऱ्या व्यक्तीस पर्यटक असे म्हणतात. अशी पर्यटकाची व्याख्या World Tourism Organization या संस्थेने केलेली आहे.

**पर्यटनाचा इतिहास :** अति प्राचीन काळापासून प्रवास करणे ही मनुष्य प्राण्याची सहज प्रवृत्ती राहिलेली आहे. प्राचीन काळातील प्रवास व त्याच्या संकल्पना या आजच्या पेक्षा फार वेगळया होत्या. प्राचीन काळी प्रवासाचा उद्देश हा नवीन प्रदेशाचा शोध घेणे, व्यापार करणे आणि धार्मिक स्थळांना भेटी देणे अशा प्रकारचा असायचा. प्राचीन काळातील प्रवासी आणि व्यापारी अनेक देशातून विविध भुप्रदेशातून, विविध राज्यातून प्रवास करत असायचे त्यामुळे अनेक राज्यांच्या, देशांच्या राजधान्या, बंदरे, शहरे तसेच व्यापारी बाजारपेठांची केंद्र, प्रवासाचे व्यापारी मार्ग, या गोष्टींचा त्यांच्याशी संबंध येत असे. अशा प्रकारचा प्रवास आणि व्यापारामुळे विविध संस्कृती आणि मानवी समुह यांची परस्पर ओळख झाली. या ओळखीतून पुढे अनेक गोष्टींची देवाण घेवाण झाली. अशा पर्यटनामुळेच एकमेकांच्या समाजजीवनाचे आवलोकन झाले. आनंद, मनोरंजन आणि व्यापार या गोष्टीसाठी प्रवास ही संकल्पना प्रथम युरोपमधील रोमन लोकांनी रुजवली, रोमन सांम्राज्याच्या काळात तेथील लोक इजिप्त देशात जाऊन तेथील पिरॅमिडस पाहात असत. त्याचप्रमाणे ग्रीसमधील अथेन्स व स्पार्टा या नगरांची नगररचना तेथील मंदिरे, मुर्ती व क्रीडांगणे पाहण्यासाठी जात. पुढील काळात युरोपखंडामध्ये औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीच्या उदयानंतर जगभर युरोपीयन लोकांच्या वसाहती निर्माण झाल्या व त्याचा परिणाम म्हणून संपूर्ण जगातून संपत्तीचा ओघ युरोपखंडाकडे वाहू लागला. याचा परिणाम असा झाला की, पर्यटन ही फक्त श्रीमंताचीच मक्तेदारी न राहाता मध्यमवर्ग देखील पर्यटनात सहभागी होऊ लागला. त्यामध्ये व्यापारी, धर्मसुधारक, विध्दान, लेखन इत्यादी लोकांचा समोश होता.

**पर्यटनाचे प्रकार :**

प्रवास करणे, पर्यटन करणे हे मानवी स्वभावाचे एक अंग आहे. आजच्या युगामध्ये समाजातील अनेक लोक विविध कारणासाठी पर्यटन करतांना आढळतात. त्यामध्ये उद्योगपती उच्च अधिकारी तसेच राजकीय व्यक्ती,उच्च मध्यमवर्गीय लोक, इतरांच्या तुलनेचे अधिक पर्यटन करतात.

सध्या पर्यटन ही एक आवश्यक बाब बनली आहे. कारण पर्यटनामुळे थकवा दूर होऊन व्यक्ती नव्या उत्साहाने कामाला लागतो. पर्यटनाचे विविध प्रकार आहेत. व्यक्ती आपली गरज आणि पात्रतेनुसार पर्यटनाचे आप आपले प्रकार निवडतात.





**१. स्थानिक पर्यटन :** पर्यटकास एखादया पर्यटनाचे नियोजन करत असतांना स्थानिक पर्यटन केंद्राची माहिती असणे आवश्यक आहे. विशिष्ट स्थानिक स्थळाची ऐतिहासिक किंवा भौगोलिक ख्याती असावी लागते. सातारा जिल्हयातील महाबळेश्वर, सिंधुदुर्ग जिल्हयातील अकोला , नगर जिल्हयातील थंड हवेची ठिकाणे स्थानिक पर्यटन केंद्रे झाली आहेत. कर्नाटकामध्ये गेल्यास हंपी त्याचप्रमाणे बदामी या ठिकाणी असलेल्या लेण्या स्थानिक पर्यटन केंद्रे म्हणून पुढे आलेली आहेत. हैद्राबाद या ठिकाणची रामोजी सिटी जी नव्याने स्थानिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित झाली आहे. कॉर्बेट नॅशनल पार्क हे असेच स्थानिक पर्यटनाचे उदाहरण आहे. हा पार्क उत्तरांचलमध्ये असून ते राष्ट्रीय उद्यान आहे. मध्यप्रदेशामध्ये कान्हा किसलिंग व बांधवगढ ही उभयारणे स्थानिक पर्यटन केंद्र म्हणून प्रसिध्द आहेत.

**२. हिवाळी पर्यटन :** भारतीय पर्यटनाच्या इतिहास हा हजारो वर्ष जुना आहे. हजारो वर्षांपासून भारतीय उपखंडातील लोक हे तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याकरीता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पर्यटन करीत असल्याचे संदर्भ प्राचीन भारतीय धार्मिक ग्रंथातून हजारोंच्या संख्येने मिळतात. कुंभमेळा, चारीधाम यात्रा, पंढरपूर आणि आळंदीची वारी.

- अशाप्रकारे धार्मिक पर्यटन भारत या देशामध्ये अनादिकाळापासून पारंपारिक पध्दतीने सुरु आहे. युरोपीयन इंग्रजांनी जेव्हा भारतावर राज्य निर्माण केले. तेंव्हा त्यांच्या दोन राजधान्य असत. एक हिवाळी राजधानी आणि दुसरी उन्हाळी राजधानी हे ब्रिटीश उन्हाळयामध्ये महाबळेश्वर, शिमला, कश्मीर, उंटी, म्हैसुर अशा ठिकाणी राहाणे पसंत करीत. ब्रिटीश हे राज्यकर्ते होते. त्यांच्याकडे कामासाठी किंवा निगराणीसाठी भारतातील कांही राजे महाराजे किंवा अधिकारी असायचे. ज्यांना कामानिमित्त इंग्रजांच्या मागे-मागे, त्या - त्या ठिकाणी जावे लागे. भारताला स्वातंत्र्य मिळाले व ब्रिटीश हा देश सोडून गेले. पण त्यांच्या नंतर येथील श्रीमंत घराणी आणि राजे यांना मात्र अशा फिरण्याची चटक लागली व भारतामध्ये हिवाळी पर्यटन हा प्रकार उदयास आला.

**३. पावसाळी पर्यटन :** पावसाळी पर्यटनाच्या मर्यादित काळात अमर्याद पर्यटक अनेक नैसर्गिक स्थळांना भेटी देतात. शनिवार, रविवार तसेच जोडून सुट्टयाच्या काळामध्ये तर गर्दीचे विक्रम नोंदविले जातात. याचा परिणाम म्हणून वाहतुकीची कोंडी पार्किंगच्या वाहनांच्या रांगा, हुल्लडबाज पर्यटकांचा त्रास, बेफिकीर पर्यटकांची कचराबाजी, हलगर्जी पर्यटकांचे अपघात, वादावादी आणि शेवटी पर्यटनबंदी, विशेषत: पावसाच्या सरी बरसत असतांना, कांदा भाजी, वडा-पाव, खात-खात भिजण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटनस्थळे हाऊसफुल होतात. स्थानिक प्रशासन कोलमडते आणि शेवटी बरीचशी पर्यटनस्थले ऐन हंगामात बंद केली जातात.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये खंडाळला-लोणावळा, मुळशी-ताम्हिणी, खडक वासला, सिंहगड, लोहगड, विसापूर, माळशेज घाट, भीमाशंकर, सागरी किनारे, धबधबे अशा ठिकाणी पावसाळी पर्यटनाची दुर्दशा बघायला मिळते. पावसाळी पर्यटन स्थळावर बंदी व गर्दीच्या बातम्यामुळे एकुणच महाराष्ट्रातील पर्यटनाचे नकारात्मक चित्र तयार होते. म्हणून त्यावर त्वरीत उपाययोजना होणे गरजेचे आहे.

**४. आरोग्य पर्यटन :** या प्रकारच्या पर्यटनामध्ये पर्यटक उल्हाददायक स्वच्छ हवामानात आपल्या प्रकृतीत सुधारणा करण्यासाठी अथवा आहे, तशीच ठेवण्यासाठी प्रयत्न करतो. पूर्वी यालाच हवापालट असे म्हणत. लोकमान्य टिळक अशाच कारणासाठी सिंहगडावर जाऊन राहत. प्रदुषणमुक्त व अल्हाददायक



Scanned with CamScanner

वातावरण व जोडीला निसर्गसौंदर्य असल्यास आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच स्थानिक पर्यटनास पर्यटक जवळच्या शांत निसर्गसंपन्न व सौंदर्याने नटलेल्या परिसरात हवा पालटासाठी जातात. अशा पर्यटनात पर्यटक एका आठवडयापासून ते तीन महिन्यापर्यंत वास्तव्य करतात. उदा. महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा, वाई इ. गावी जाउन राहणे.

५. **निसर्ग पर्यटन :** निसर्ग पर्यटन म्हणजे पर्यटकांकरीता फक्त सोयी सुविधा वाढविणे असे नसुन ही क्षेत्रे जैविक विविधतेची आश्रयस्थाने असल्यामुळे अशा क्षेत्रांचे आहे, त्या स्थितीमध्ये संरक्षण करणे अगत्याचे आहे. तसेच ज्या लोकांची उपजिविका या क्षेत्रांवर अवलंबून आहेत व ज्यांना या क्षेत्रांचे संगोपन करणे आवश्यक वाटले पाहिजे त्यांचे आर्थिक परिस्थितीत वाढ करणे सुध्दा तेवढेच महत्त्वाचे आहे. पर्यटकांकरीता लागणाऱ्या दैनंदिन सोयीसुविधा पुरवित या लोकांना लाभ मिळू शकतो. त्यामुळे राज्यात पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी तसेच निसर्ग पर्यटनाला चालना देण्यासाठी स्थानिक लोकांनी संस्कृती जतन करण्यासाठी निसर्ग पर्यटन धोरण आवश्यक आहे. स्थानिक रहिवाशांच्या संस्कृतीचा आविष्कार अप्रदुषित नैसर्गिक क्षेत्रात वन्यपशुपक्षी व झाडेझुडपे यांचा अभ्यास निसर्गाची ओळख तसेच निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी फिरणे म्हणजे निसर्ग पर्यटन.

६. **शैक्षणिक पर्यटन :** शैक्षणिक पर्यटन म्हणजे अभ्यासाच्या दृष्टीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केलेला प्रवास होय. यामध्ये शैक्षणिक सहली, शैक्षणिक परिषदा किंवा संशोधनासाठी देशामध्ये किंवा देशाबाहेर केलेला प्रवास यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या पर्यटनाला जास्त महत्व आहे. कारण क्षेत्र अभ्यास केल्यामुळे वेगवेगळया संकल्पना समजण्यास मदत होते.

महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांना पर्यटनाच्या वेळी ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक माहिती मिळावी. त्याचप्रमाणे त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्यासाठी संधी मिळावी यासाठी एका शैक्षणिक वर्षामध्ये एक शैक्षणिक सहल अथवा ग्रामीण पर्यटनाचे आयोजन करण्यास शाळांना मान्यता देण्यात आलेली आहे.

७. **ऐतिहासिक पर्यटन:** ऐतिहासिक वस्तु किंवा वास्तु हा पर्यटनातील असा महत्त्वाचा घटक आहे. की त्या घटकाने आजवरच्या पर्यटन विकासावर प्रभाव टाकलेला आहे. विविध प्रदेश, प्रांत व देशातील वेगवेगळया काळातील ऐतिहासिक वास्तु पर्यटनांचे आकर्षण ठरलेले आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात अशी असंख्य ऐतिहासिक स्थळे आहेत की, त्या पर्यटनामध्ये तिथला जीवंत इतिहास अनुभवतायावा हा पर्यटकांचा उद्देश असतो.

८. **सांस्कृतिक पर्यटन :** विविध भु-भाग, प्रदेश व देशातील लोकांच्या चालीरिती, रुढी, परंपरा,आचार-जीवन, आहार इ. समजावून घेणे अथवा त्यामधील नाविन्यता अनुभवने या हेतूने हे पर्यटन केले जाते. उदा. गोव्यातील कार्निवल, कोकण-उत्सव, खजुराहो-महोत्सव, म्हैसुरचा दसरा महोत्सव इ. भारतामध्ये सांस्कृतिक पर्यटनाला परदेशी पर्यटकांची मोठी गर्दी असते. सांस्कृतिक पर्यटनामध्ये विविध सण-उत्सव, दसरा, दिवाळी इ. स्वरुपाचे प्रकार यामध्ये मोडतात.

९. **कृषी पर्यटन :** कृषी पर्यटन हा पर्यटकाचा नवीन प्रकार अलीकडच्या काळात उदयास येत आहे. बदलत्या जीवनशैलीत व वाढत्या शहरीकरणामध्ये ग्रामीण भागात शेती जीवनाशी निगडीत जीवनशैली आधुनिक जीवन शैलीत समाज आपला पांरपारिक परिवेश हरवत चाललेला आहे. कृषी जीवनाशी संबंधीत





सर्व घटकांची ओळख व्हावी या उद्देशाने या पर्यटनाचा विकास होत आहे. उदा. सुगीच्या दिवसामध्ये मका, ज्वारी, हरभरा इ. संबंधी हुरडापार्टी इ. स्वरुपामध्ये याचे आयोजन केले जात आहे. याशिवाय शहरी जीवनातील लहान मुलांना शेतकरी व शेतीसाठी संबंधीत घटकांची ओळख व आवड निर्माण व्हावी. म्हणून अनेक कुटुंब एखादया शेतकऱ्यांच्या शेतामध्ये वास्तव्यास राहून शेतकरीजीवन अनुभवण्याचा प्रयत्न करतात. या पर्यटन प्रकारास भविष्य काळात फारच मागणी वाढेल असे अभ्यासकांना वाटते.

**सारांश :** प्रवास हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून प्राचीन काळापासून मानव प्रवास करत आला आहे. प्राचीन काळी नवीन प्रदेशांचा, स्थळांचा, चमत्कारीक वस्तूंचा शोध घेण्यासाठी प्रवास केला जात असे. यानंतर पर्यटनाचे स्वरुप थोडेसे बदलले व पर्यावरणातील बदल, धार्मिक स्थळांच्या भेटी असे झाले. प्राचीन काळाच्या तुलनेत आधुनिक पर्यटनाचे स्वरुप बदलले आहे. पर्यटन हे पैसे मिळवण्याचे साधन बनले आहे. तसेच धक्काधक्कीच्या जीवनातून चार दिवस आरामात घालवणे असे स्वरुप सध्या आहे.

पर्यटन हे सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक धार्मिक व भौगोलिक घटकावर अवलंबून असलेले दिसते. पर्यटन हा आधुनिक व अत्यंत झपाटयाने वाढणारा व विस्तारणारा सेवा उदयोग म्हणून समोर येत आहे. ग्रामीण शहरी लोकांना रोजगारांची उपलब्धता या उदयोगातून होते. हे या उद्योगाचे खास वैशिष्टये आहे.

**संदर्भ :**


१. https://mr.m.wikipedia.org
२. https://maharashtratimes.indiatimes.com
३. mr.vikaspedia.in> education>polic..
४. www.unishivaji.ac.in>home
५. मधूकर ढवळीकर, पुरातत्व विद्या, मुंबई, १९८०.
६. डॉ.एस.एस.गाठाळ, इतिहासाच्या शाखा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद,२०१५.
७. सांकलिया/माटे, महाराष्ट्रातील पुरातत्व.


◆◆◆



Scanned with CamScanner